**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुरेश दत्ताराम शृंगारे, वय – ५७ वर्षे,

व्यवसाय – शेती व पोलीस पाटील

रा. – कोर्ले, ता. देवगड

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. मला दिनांक ०३/०३/२०२५ रोजी चव्हाण पोलीस यांनी कोर्ले खानविलकरवाडी येथे बोलाविले होते. मी, प्रकाश तेली व अपूर्वा उपस्थित होतो. अपूर्वा सांगत होती. पोलीसांनी पंचनामा केला व मला सही करणेस सांगितली. आता मला दिनांक ०३/०३/२०२५ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास निशाणी क्रमांक पी१/पीडब्ल्यू१ देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. ए. एम. माणगांवकर यांचेकडून**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळ म्हणून दाखविलेले स्थळ म्हणजे पोभुर्ले ते खारेपाटण जाणा-या रस्त्यावरुन खानविलकरवाडी कडे जाणारी पायवाट होय. हे म्हणणे खरे आहे की, सदर पाटवाटेच्या दुतर्फा लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या परिसरात संतोष हरदास, रामदास हरदास, धोंडू खानविलकर, विजय हरी खानविलकर, आत्माराम खानविलकर, दत्ताराम हरदास, नारायण तर्पे व प्रकाश तेली यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस चव्हाण यांनी घटनास्थळाची छायाचित्रे घेतली होती. आता मला छायाचित्रे दाखविण्यात आली. त्यांना **एम.ओ.नं. १ व २** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेले छायाचित्रे ही घटनास्थळाची आहेत. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं.१ मधील स्लॅबचे घर ज्याला पत्र्याचे छप्पर आहे ते संतोष व रामदास हरदास यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं. १ मधील पत्र्याचे छप्पर असणारे घर विजय

हरी खानविलकर यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं. १ मधील शिडी लावलेले पत्र्याचे छप्पर असणारे घर धोंडू खानविलकर यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं. २ मध्ये खापरीचे छप्पर असणारा गोठा हा संतोष व रामदास हरदास यांच्या घरासमोर असून तो त्याच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.नं. १ व एम.ओ.नं. २ मधील फोटो फिर्यादी अपूर्वा हिचे घर अगर कुंपण नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करते वेळेस मला फिर्यादी अपूर्वा हिचे घर अगर कुंपण दाखविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पायवाटेच्या काम चालू असताना पाडण्यात आलेले गडगे मला दाखविण्यात आलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील मजकूर खोटा असून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.04.28 14:28:19 +0530

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.२८/०४/२०२६